Direct Interview Account- 1

# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (आस्थापना शाखा)

जाहिरात क्र./६८९/पी.आर

दिनांक :-१४/११/२०२५

## थेट मुलाखत

नागपूर महानगरपालिकेत वित्त विभागातंर्गत आस्थापनाविषयक बाबी DCPS अंतर्गत प्रकरणे, सेवानिवृत्ती प्रकरणे, अतिप्रदान प्रकरणे, महालेखाकार व स्थानिक निधी लेखा परिक्षण आक्षेप प्रकरण, देयक आणि इतर वित्त विषयक तपासणी प्रकरण आदी प्रकरणे तपासणी व निपटारा करणे तसेच इतर विवक्षित सेवा कामासाठी तसेच मनपा अंदाजपत्रकाबाबतची कामे हाताळणे इत्यादी कामासाठी संबंधित अनुभव व पात्रता असलेल्या सेवानिवृत्ती अधिकाऱ्यांमधून मनपा वित्त विभागातंर्गत **"कंत्राटी निगम लेखा सल्लागार"** व **"कंत्राटी अंदाजपत्रक सल्लागार"** या पदावर कंत्राटी /करार तत्वावर शासन निर्णय १० जून, २०२५ नुसार अनुज्ञेय मासिक पारिश्रमिक तत्वावर प्रथमत: ६ महिन्याच्या कालावधीकरीता, नियुक्ती करावयाची आहे.

उक्त कामाचा अनुभव असलेल्या इच्छुक सेवानिवृत्त उमेदवारांनी थेट मुलाखती करीता आवश्यक कागदपत्रासह दि.२४/११/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता, अतिरिक्त आयुक्त (शहर), सिव्हील लाईन मनपा नागपूर यांचे कार्यालय येथे उपस्थित राहावे.

| अ.क्र | पदाचे नाव | एकुण पद | वयोमर्यादा | पात्रता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | **"कंत्राटी निगम लेखा सल्लागार"** (सेवा निवृत्तीच्या प्रकरणाची तपासणी करीता) | १ | कमाल ६५ वर्षे | १. महाराष्ट्र शासकीय सेवेतील/ महानगरपालिकेतील/ स्थानिक स्वराज्य संस्था किंवा इतर शासकीय सेवेतील, वर्ग – २ पदावरुन सेवानिवृत्त झालेले (सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनमान ९३००-३४८००ग्रेड पे ४४००) (सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ४१८००-१३२३००)<br>२. लेखा व वित्त सेवेतील २ वर्षाचा कामाचा अनुभव<br>३. मनपा वित्त सेवेतील अनुभव असल्यास प्राधान्य |
| २ | **"कंत्राटी अंदाजपत्रक सल्लागार"** (अंदाजपत्रकाबाबत कामे करण्याकरिता) | १ | | |

वरील पदाकरीता इच्छुक उमेदावारांनी दि.२४/११/२०२५ रोजी सकाळी १०.३० ते १२.०० पर्यंतच्या दरम्यान आपले नाव नोंद करावे. विहीत वेळेनंतर येणाऱ्या उमेदवरांच्या नावाची नोंद करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. पात्र अर्जदाराची मुलाखत त्याच दिवशी लगेच घेण्यात येईल.

अर्हता:-

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.
२. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज अति. आयुक्त नागपूर महानगरपालिका, सिव्हील लाईन, नागपूर यांचेकडे सादर करावेत.
३. वयोमर्यादा विचारात घेतांना दि.२४/११/२०२५ ही तारीख ग्राहय धरण्यात येईल.
४. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीचा मानधनापोटी होणारा खर्च व्यपद क्र. A२०२००४१०००३ मधूनवित्त विभागाच्या आस्थापेवरुन काढण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

५. उमेदवारांनी त्यांच्या वय,शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती स्वसांक्षाकित करुन जोडाव्यात.

६. उमेदवारांनी अर्ज सादर करुन अर्जासोबत एक फोटो चिकटवावा व एक फोटो संलग्न करावा.

७. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विविक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीशी राहील. व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल, तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती, मान्य असल्याचे बंधपत्र/हमीपत्र उमेदवाराला दयावे लागेल.

८. करार पध्दतीवरील उमेदवारांना नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.

९. मासिक पारिश्रमिक-शासकीय/निमशासकीय सेवा- सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची विहीत कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून)त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी कायम राहील.

१०. सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

११. सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी, तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही गुन्हा दाखल नसावा व चारित्र्य चांगले असावे.

उपरोक्त पदाकरिता अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावयाचा असून अर्जाचा नमूना व उक्त पदांकरिता आवश्यक अर्हता/अटी/शर्तीमहानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वर उपलब्ध आहे.

हस्ता/- डॉ.अभिजीत चौधरी (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
महानगरपालिका, नागपूर

दिनांक :- / /२०२५

Scanned with OKEN Scanner

# अर्जाचा नमूना

१. पदाचे नाव :- ..........................................................................................

२. अर्जदाराचे नांव :- ..........................................................................................

३. पूर्ण पत्ता :- ..........................................................................................

..........................................................................................

भ्रमणध्वनी क्रमांक :- ..........................................................................................

ई-मेल आय डी :- ..........................................................................................

४. जन्म दिनांक :- ..........................................................................................

५. दि / /२०२५ला वय :- ..........................................................................................

६. सेवानिवृत्तीचे वेळी धारण
केलेले पद व कार्यालय :- ..........................................................................................

७. शैक्षणिक पात्रता :- ..........................................................................................

८. अ) सेवाकाळातील विभागीय
चौकशी सुरु आहे/ होती काय ?
ब) असल्यास विभागीय चौकशीत
शिक्षा झाली होती का ?
क) अर्जदाराविरुध्द कोणताही
गुन्हा दाखल आहे का ?
ड) गुन्हादाखलअसल्यासगुन्हाबाबततपशील

९. अनुभव :- ..........................................................................................

| अ.क्र. | संस्थेचेनाव | धारणकेलेल्यापदाचेनाव | कालावधी (पासून-पर्यंत) | कामाचाअनुभव |
|---|---|---|---|---|
| | | | | |

स्वाक्षरी

Scanned with OKEN Scanner